# मेट्रो ३ मार्गिकेतील २७ वा बोगदा पूर्ण

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

गोदावरी ३ या टीबीएमद्वारे मिठी नदीखालील १.५ किमी अंतर पार करत मेट्रो-३(कुलाबा-वांद्रे-सीप्झ) ने भूयारीकरणाचा २७ वा टप्पा बुधवारी पूर्ण झाला. अवघ्या २८७ दिवसांत ७.९ किमी पैकी ७.५ किमीचे भुयारीकरण पूर्ण करण्यात मेट्रो ३ च्या कर्मचार्यांना यश आले आहे.

मेट्रो ३ या कुलाबा- वांद्रे-सीप्झ भूमिगत मेट्रो कामाला चांगलाच वेग आला आहे. बुधवारी टीबीएम गोदावरी ३ ने पॅकेज ५ मधील १०७२ रिंग्जच्या सहाय्याने भुयारीकरण पूर्ण केले. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे सुरु असलेल्या मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणाच्या कामाने गती घेतली आहे. कुलाबा-वांद्रे सीप्झ या संपूर्ण मार्गिकेचे एकूण ५५ किमी (अप आणि डाऊन) भुयारीकरणाचे काम टीबीएमद्वारे प्रगतीपथावर आहे. हा मार्ग देशातील सर्वात लांब पूर्णत भूयारी मार्ग आहे.

भुयारीकरणाचे काम तब्बल १७ टीबीएमच्या साहाय्याने सुरु असून ही टीबीएम जमिनीत उतरवण्यासाठी मुंबईतील कफ परेड, इरॉस, आझाद मैदान, सायन म्युझिअम, सिद्धीविनायक मंदिर, नया नगर, बीकेसी, विद्यानगरी, पाली मैदान, सारीपुत, सहार रोड आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ येथे शाफ्ट तयार केले आहे.

भुयारीकरणासोबतच खोदकाम, बेस स्लॅब, कॉर्नकोर्स स्लॅब, कॉलम तसेच भिंतीची बांधणी यासारखी कामेही युद्धपातळीवर सुरू आहेत. या भुयारीकरणाच्या कामासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला अनेक वादांना तोंड द्यावे लागले आहे. पूर्णपणे भूमीगत अर्थात जमिनीखालून जाणाऱ्या या मार्गिकेवर एकूण २७ थांबे आहेत.



- कुलाबा -वांद्रे सिप्झ या पहिल्या भुयारी मेट्रो-३ मार्गातील आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलपर्यंत ३.८१२४ किमी भुयारीकरण गेल्या वर्षी पूर्ण झाले होते. त्यामुळे डाऊनलाईन बोगदा पूर्ण करणारी मेट्रो-३ प्रकल्पात वैतरणा ही पहिली मशिन ठरली.
- या प्रकल्पाचे काम एकूण सात भागांमध्ये विभागले आहे. सिद्धीविनायक ते धारावी दरम्यान सर्वात मोठा टप्पा आहे. यात ११.०२ किमीच्या भुयारीकरणापैकी ६.८९ किमी भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.
- कफ परेड ते सीएसटी या पहिल्या पॅकेजमधील ५.८९ किमीपैकी ३.२१ किमीचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. विधान भवन ते चर्चगेट या सुर्या १ ने केलेल्या भूयारीकरणानंतर कमी दिवसांत झालेला हा मोठा टप्पा कृष्णा २ टीबीएमने पार केला.